आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२८ डिसेंबर २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात सरकारी इतमामाने अंत्यसंस्कार
- राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री आणि भूतान नरेश यांच्यासह अनेक मान्यवरांची श्रद्धांजली
- मस्साजोग हत्या प्रकरणी बीड इथं निषेध मोर्चा-घटनेची तातडीनं दखल न घेतल्यास, तीव्र आंदोलनाचा इशारा
- बॉर्डर - गावस्कर चषक मालिकेतल्या चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्यात, भारताच्या नितेश रेड्डीचं पहिलं कसोटी शतक

**आणि**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवरून मन की बात या कार्यक्रमातून साधणार देशवासियांशी संवाद

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री आणि जागतिक ख्यातीचे अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंह यांना आज शोकाकुल वातावरणात भावपूर्ण निरोप देण्यात आला. दिल्लीच्या निगम बोध घाटावर आज त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. शीख धर्मीय संस्कारांनुसार त्यांच्या पार्थिवाला मुखाग्नी देण्यात आला. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, लोकसभेचे सभापती ओम बिरला, नरेंद्र मोदी,अमित शाहा, भूतान नरेश जिगमे खेसर नामग्येल वांगचुक यांच्या सह अनेक केंद्रीय मंत्री तसेच

विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, सोनिया गांधी यांच्यासह अनेक नेते, उच्च पदस्थ अधिकारी, काँग्रेस कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पुष्पचक्र अर्पण केल्यानंतर सैन्यदलाच्या वतीनं शोकधून वाजवून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी त्यांना गार्ड ऑफ ऑनर म्हणजेच मानवंदना देण्यात आली. ....

**बाईट- धून.....**

मनमोहन सिंग यांच्या शवपेटीवरचा तिरंगा त्यांच्या कुटुंबियांकडे सुपूर्द करण्यात आला. त्यानतर त्यांचे पार्थिव अंत्यसंस्कारासाठी चंदनाच्या चितेवर नेण्यात आलं. यावेळी शीख धर्माच्या प्रथेनुसार प्रार्थना पठण करण्यात आलं. त्यानंतर त्यांना हवेत बंदुकीच्या फैरी झाडून मानवंदना देण्यात आली. डॉ. मनमोहन सिंह अमर रहे च्या घोषणांनी यावेळी परिसर दुमदुमून गेला होता.

**<><><><><>**

डॉ मनमोहन सिंग यांचं यथोचित स्मारक बांधण्यासाठी सरकार जागा देऊ करणार असल्याचं केंद्रीय गृह मंत्रालयानं म्हटलं आहे. स्मारकासाठी जागा देण्याची विनंती काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी काल सरकारकडे केली होती. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर लगेचच गृहमंत्री अमित शहा यांनी सिंग यांच्या कुटुंबियांशी संवाद साधून त्यांना ही माहिती दिली.

डॉ. मनमोहन सिंह यांचं स्मारक उभारलं जाईल असा निर्णय काल केंद्रीय मंत्रिमंडळानं घेतला असून काँग्रेस पक्षाला ही माहिती देण्यात आली आहे, असं भाजप खासदार आणि प्रवक्ता सुधांशू त्रिवेदी यांनी सांगितलं.

<><><><><>

पंतप्रधान म्हणून मी कमजोर होतो की कणखर हे इतिहास ठरवेल असं डॉ.मनमोहन सिंग म्हणाले होते. आज मनमोहन सिंग यांना सर्व जग, श्रद्धांजली देत असताना त्याची प्रचिती येत आहे. असं मत, कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केलं. माजी पंतप्रधान दिवंगत डॉ.मनमोहन सिंग यांना प्रदेश काँग्रेसच्या मुख्यालयात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली यावेळी ते बोलत होते. गरिबीतून सुरुवात करुन, बुद्धीमत्तेच्या जोरावर, पंतप्रधान होऊन देशाला आर्थिक दिशा आणि आर्थिक शिस्त लावण्याचं काम, डॉ.मनमोहन सिंग यांनी केलं ते देश तसंच जग विसरु शकत नाही. असे महान व्यक्तिमत्व आपल्यात नाही याचं दुःख असून, देशासाठी त्यांनी केलेलं समर्पण देश कधीही विसरणार नाही असं ते म्हणाले.

<><><><><>

राज्याला कृषी, वीज निर्मिती, उद्योग आणि सेवा क्षेत्रात आणखी पुढे घेऊन जाण्यासाठी सौर ऊर्जेवर भर देण्यात येत आहे. त्यामुळे राज्यातील सौर ऊर्जा प्रकल्पांच्या कामांना गती देतानाच त्यात गुणवत्ता राखण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले. सह्याद्री अतिथिगृहात झालेल्या राज्य विद्युत मंडळाच्या सूत्रधारी कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत ते

बोलत होते. बैठकीस ऊर्जा राज्यमंत्री आणि मंडळाच्या उपाध्यक्ष मेघना बोर्डीकर आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

<><><><><>

इस्त्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्था येत्या सोमवारी स्पेडेक्स म्हणजेच अंतराळात दोन यानं परस्परांसोबत जोडण्याचा प्रयोग करणार आहे. अंतराळ राज्यमंत्री डॉक्टर जितेंद्र सिंग यांनी आज एका मुलाखतीत ही माहिती दिली. इस्त्रोचा हा हा प्रयोग ऐतिहासिक प्रयोग असेल, यामुळे अंतराळात दोन यानं परस्परांशी जोडण्यात प्रभुत्व असलेल्या देशांच्या यादीत भारतही आपल्या नावाची नोंद करणार असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी, या मागणीसाठी बीडमध्ये सर्वपक्षीय आणि सर्वधर्मिय मूकमोर्चा काढण्यात आला. या मोर्चा मोठ्या संख्येनं नागरिक सहभागी झाले होते.

खासदार बजरंग सोनवणे, आमदार सुरेश धस,आमदार जितेंद्र आव्हाड, आमदार संदीप क्षीरसागर, आमदार विजयसिंह पंडित, आमदार प्रकाश सोळंके, छत्रपती संभाजीराजे, मनोज जरांगे पाटील यांच्यासह विविध पक्षांचे ज्येष्ठ नेते, पदाधिकारी या मोर्चात सहभागी झाले होते.

आम्हाला बीडचा बिहार होऊ द्यायचा नाही, त्यामुळे जिल्ह्याचं पालकमंत्री पद आमदार धनंजय मुंडे यांना देऊ नये अशी मागणी छत्रपती संभाजीराजे यांनी केली.

मुख्यमंत्र्यांनी या आंदोलनाची गांभीर्यानं घेऊन वेळीच दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी जितेंद्र आव्हाड यांनी केली.

या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई झाली नाही तर राज्यभर हे आंदोलन अधिक तीव्र केलं जाईल, असा इशारा मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी यावेळी दिला.

**<><><><><>**

ज्येष्ठ पत्रकार डॉ. किरण ठाकुर यांचं आज अल्पशा आजारानं निधन झालं. ते ७७ वर्षांचे होते. गेल्या आठवड्यात त्यांना थकवा जाणवल्यानं खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. तिथं आज सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. डॉ. ठाकुर तीन दशकांपेक्षा जास्त काळ पत्रकारितेत सक्रीय होते. विविध वृत्तपत्रं, वृत्तसंस्था आणि नियतकालिकांसोबत त्यांनी काम केलं. त्यानंतर त्यांनी अध्यापनाच्या क्षेत्रात प्रवेश केला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभागाचे ते माजी विभागप्रमुख होते.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉर्डर गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या मेलबर्न इथं सुरू असलेल्या चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्यात, तिसऱ्या दिवसअखेर भारतानं आपल्या पहिल्या डावात, ९ बाद ३५८ धावा केल्या आहेत. पहिल्या डावात भारत अजूनही ११६ धावांनी पिछाडीवर आहे.

नितेश रेड्डी आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी आठव्या गड्यासाठी १२७ धावांची भागिदारी करत, भारताला फॉलोऑनच्या संकटातून बाहेर काढलं. नितेश

रेड्डी यानं आंतरराष्ट्रीय कसोटी कारकिर्दीतलं पहिलं शतक झळकावलं. वॉशिंग्टन सुंदर ५० धावांवर बाद झाला.

<><><><><>

२१ वा थर्ड आय आशियाई चित्रपट महोत्सव १० ते १६  जानेवारी या कालावधीत मुंबई आणि ठाणे इथं आयोजित केला जाणार आहे. महोत्सवात ६१ चित्रपटांची निवड झाली आहे. भारतीय चित्रपट विभागात मल्याळम, कन्नड, तेलुगू, बंगाली, आसामी या भाषांमधील अकरा चित्रपटांचा समावेश आहे. महोत्सवात गीतकार जावेद अख्तर यांना 'आशियाई चित्रपट संस्कृती पुरस्कार' देण्यात येणार असून पत्रकार रफिक बगदादी यांना 'सत्यजित राय मेमोरियल पुरस्कार' देऊन  सन्मानित केलं जाणार आहे.

<><><><><>

दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची आज घोषणा करण्यात आली. येत्या  १५ ते १९ जानेवारी २०२५ या दरम्यान छत्रपती संभाजीनगर इथं हा महोत्सव होणार आहे. या महोत्सवात भारतीय सिनेसृष्टीतील अतुलनीय योगदानाबद्दल दिला जाणारा पद्मपाणि जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शिका, पटकथाकार, निर्मात्या, लेखिका आणि नाटककार पद्मभूषण सई परांजपे यांना जाहीर करण्यात आला आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आकाशवाणीच्या मन की बात कार्यक्रमातून उद्या देशो देशीच्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. या मासिक कार्यक्रमाचा हा 117 वा भाग आहे. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, न्युजऑनएआयआर  ॲप तसंच एअर न्यूज, दूरदर्शन आणि प्रधानमंत्री

कार्यालयाच्या युट्युब वाहिनीवरुन हा कार्यक्रम थेट प्रसारित केला जाईल.

<><><><><>

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या धावपट्टीवर उद्या दुपारी  12 वाजता इंडिगो एअरलाईनचं व्यावसायिक विमान  उतरणार आहे. ऑक्टोबर महिन्यात लष्कराचं विमान प्रत्यक्ष धावपट्टीवर उतरलं होतं. तर  हवाई दलाच्या सुखोई 30 विमानानं धावपट्टीवरून काही अंतरावर उड्डाण केलं होतं. त्यानंतर  आता व्यावसायिक विमानाचे लॅंडिंग होणार आहे.  या आधी भारतीय विमानतळ प्राधिकरणानं विमानतळावर इन्स्ट्रुमेंट लँडिंग सिस्टीम यंत्रणेची चाचणी पूर्ण केली होती.

<><><><><>

कोकणात नवीन वर्षाच्या स्वागताला होणारी पर्यटकांची गर्दी आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आज आणि उद्या असे दोन दिवस धरमतर पूल ते अलिबाग, अलिबाग ते मांडवा जेट्टी आणि अलिबाग ते रेवदंडा - मुरूड या मार्गावर अवजड वाहनांना वाहतुकीसाठी बंद ठेवला आहे. रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी यासंदर्भातले आदेश जारी केले आहेत. यातून जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱी वाहने वगळली असल्याचंही जिल्हा प्रशासनानं कळवलं आहे.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. या विभागांमधे अनेक ठिकाणी किमान तापमानात उल्लेखनीय वाढ झाली आहे. राज्यात सर्वात कमी किमान तापमान महाबळेश्वर इथं १६ अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. उर्वरीत महाराष्ट्रात हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**